# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/१०/२०२४ (शनिवार) दुपार**

---

## रामटेक पोलीसांची महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या अवैध सुगंधी तंबाखुची साठवणूक करणाऱ्या आरोपीला अटक

मा. पोलीस अधीक्षक सा. व अपर पोलीस अधीक्षक सा. नागपूर ग्रामीण यांनी नागपूर जिल्हयात अवैध धंदयावर कारवाई करून अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिले आहेत त्यांचे मार्गदर्शनाखाली अवैध धंदयावर कारवाई करीत असतांना दिनांक १८/१०/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील येथील स्टाफ यांना गुप्त माहिती मिळाल्यावरून मे राजदरबार ढाबा राष्ट्रीय महामार्ग क्र ४४ मनसर रामटेक येथे आरोपी नामे– शैलेश परसराम कावळे रा मनसर वार्ड १ रामटेक हा सुगंधित तंबाखुची साठवणूक आणि विक्री करीत आहे. त्यावरून पोलीसांनी आरोपीच्या ढाब्याची

ढाब्याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून सुगंधित तंबाखु गोल्डन सफारी ९९९ प्रत्येकी वजन ०१ किग्रॅ ३२० नग प्रत्येकी एक नग किंमत ५५० एकुण किंमत १,७६,०००रू चा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आला. सदर आरोपीविरूद्ध कलम २६(१),२६(२)(डी),२७(३)(ई),३०(२)(अ),५९ अन्न सुरक्ष आणि मानके अधिनीयम २०६६, २२३,२७४,२७५ए १२३ बीएन एस **जिवीतास हानीकारक असलेले प्रतिबंधीत अन्न पदार्थ विक्री करणे** अन्वये गुन्हा नोद आहे.

सदर कारवाई मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., मा. श्री. रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक सा. ना.ग्रा., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. रमेश बरकते, पोस्टे रामटेक येथील ठाणेदार आसाराम शेटे व स्टाफ यांनी पार पाडली.

## खुन करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे कोंढाळी :–** अंतर्गत बिहाल गोंदी येथे दि. १६/१०/२०२४ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीमती वरमाला सुरेश कुभरे वय ३६ वर्ष रा बिहालगोंदी हिचे पती मृतक नामे– सुरेश चिदंबाजी कुंभरे, वय ४० वर्ष रा. बिहालगोंदी हे रात्री घटना दि १६/१०/२०२४ चे ०८/०० वा दरम्यान हनुमान मंदीराजवळ जावुन येतो असे फिर्यादीला सांगुन निघुन गेले होता. फिर्यादीही रात्री जेवण करून आपले आईवडीलांनकडे जाण्यास निघाली तेव्हा रात्री अंदाजे १०/०० वा मंदीराच्या बाजुला असलेल्या वडाच्या झाडाखाली फिर्यादीचे पती सोबत चंद्रभान युवनाते याने झगडा भांडण करून हातबुक्याने मारहाण केली होती. त्या रात्री फिर्यादी आपल्या आईवडीलांकडे झोपण्यास गेली. दि १७/१०/२०२४ चे सकाळी ०७/००वा सुमारास फिर्यादी आपले आईच्या घराकडुन स्वत:च्या घराकडे जात असता फिर्यादीने जाउन पाहीले असता तिच्या पतीच्या डोळयावर लागुन सुजन आली होती. उजवे कानाच्या वर मार लागुन रक्त निघत होते म्हणुन फिर्यादीने गावातील लोक रमेश वरखडे सुभाष युवनाते अविनाश श्रीरामे यांचे मदतीने प्रथम प्राथमिक रूग्णालय कोंढाळी येथे आणले व तेथुन नागपुर येथे रेफर झाल्याने फिर्यादीचे उपचारा दरम्यान मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे आरोपीविरूद्ध कलम १०३ (१),बी.एन एस. २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस **आज दि. १९/१०/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.** गुन्हयाचा पुढील तपास कोंढाळी पोलीस करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर